ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख ३ डिसेंबर, १९५२ अंक ४६

## विविध माहिती

**ब्रिटिश कंपन्यांचा नफा**—लंडनमधील फिनॅन्शिअल टाइम्स ह्या नियतकालिकानें १९५२ सालच्या पहिल्या १० महिन्यांत ब्रिटिश कंपन्यांना झालेल्या नफ्याची माहिती प्रसिद्ध केली आहे. ह्या कालांत ३,०९९ कंपन्यांना १८१·५ कोटी पाउंड नफा झाला. गेल्या सालच्या ह्याच कालांत १६३·४ कोटी पौंड नफा झाला होता.

**मुत्सद्याची कन्या मोटारी विकणार**—ब्रिटनचे अमेरिकेमधील एक माजी वकील मि. लुई डग्लस, ह्यांची कन्या मिस शरमन् डग्लस ह्या अमेरिकेंत ब्रिटिश मोटारी विकण्याचा व्यवसाय करणार आहेत. ब्रिटनमधील रूट्स गटाच्या मोटारी त्या विकणार आहेत. त्यासाठी न्यूयॉर्क, लॉस एंजल्स व कॅलिफोर्निआंत त्यांना हिंडावें लागेल.

**राजस्थानांत लोखंडाचा कारखाना**—राजस्थान सरकार बनसवारा जिल्ह्यांत लोखंडाचा मोठा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. लोहमिश्रित माती सांपडणाऱ्या गांवांना जोडणारा एक रेल्वे-रस्ता बांधण्यांत यावा, अशी सूचना मध्यवर्ती सरकारला करण्यांत आली आहे.

**कटक शहराच्या सुधारणेसाठी**—येत्या पांच वर्षांत कटक शहराच्या सुधारणेसाठी १५ लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. सुधारणांत पहिला अनुक्रम रस्त्यांना देण्यांत येणार आहे. मुख्य रस्ते २८ फूट रुंद करण्यांत येणार असून बाकीचे निदान १६ फूट रुंद ठेवण्यांत येतील. सांडपाण्याच्या निचऱ्याचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे.

**पंचवार्षिक योजनेचा प्रचार**—मद्रास सरकारच्या माहितीखात्यानें भारताच्या पंचवार्षिक योजनेची माहिती देणारीं छोटीं पुस्तकें तामीळ आणि तेलगू भाषांतून काढलीं आहेत. पुस्तकांत १५ प्रकरणें असून विषय समजावून देण्यासाठी योग्य अशा आकृतीहि देण्यांत आल्या आहेत.

**नौकरी पाहिजे असेल तर फी द्या**—भारतामधील उद्योगविनिमय केंद्रांवर नौकरीसाठी नांवें नोंदणारांची संख्या अलीकडे फार वाढली आहे. ह्यापुढें नांवे नोंदणाऱ्यांकडून थोडीशी फी घेण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे असें समजतें.

**चराईच्या रानांपासून उत्पन्न**—भारतीय रेल्वेच्या अखत्यारांतील गुरें चारण्याचीं रानें वर्षापुरतीं विकून भारतीय सरकारनें गेल्या वर्षी ५,००,००० रुपये मिळविले असें समजतें. ही बहुतेक जमीन पडीक असून तीवर गवताशिवाय दुसरें कांहीं उगवत नव्हतें.

**अमेरिकेंत योग-शिक्षणाचीं केंद्रें**—भारतामधील सुप्रसिद्ध हटयोगी श्री. राव ह्यांनीं अमेरिकेंतील कांहीं प्रसिद्ध व्यक्तींना आसनें व प्राणायाम ह्यांचें शिक्षण दिलें. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर आणि न्यूयॉर्कमध्यें त्यांनीं योग-शिक्षणाचीं केंद्रेंहि स्थापन केलीं आहेत. लंडनमध्यें एक केंद्र उघडण्याचा त्यांचा विचार आहे.

**जर्मन कंपनीची मदत**—उत्तरप्रदेश सरकारनें ३०० ट्यूब विहिरी खोदण्याचें काम एका जर्मन कंपनीला दिलें आहे. भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान झालेल्या तांत्रिक साह्याच्या कराराप्रमाणें, अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी त्या खोदण्यांत येत आहेत.

**सारनाथजवळ वेधशाळा**—बनारसजवळ सारनाथ येथें एक वेधशाळा स्थापन करण्याचें उत्तरप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. वेधशाळेंत एक मोठी दुर्बिण बसविण्यांत येणार आहे. गेल्या वर्षी ६८,००० रुपये देऊन दुर्बीण खरेदी करण्यांत आली आहे. त्याशिवाय इतर उपकरणांसाठी ९३,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**भारतांत आलेले परदेशी बोलपट**—१७ नोव्हेंबर, १९५२ पर्यंत भारताच्या सेन्सॉर बोर्डापुढें १६५ परदेशीय बोलपट निरीक्षणासाठी आले आहेत. त्यांपैकीं १४१ ब्रिटनचे, ४ रशिआचे, ६ अमेरिकेचे आणि १४ इतर देशांचे आहेत. १९५१-५२ सालीं २,२२६ अमेरिकन बोलपटांना परवाने देण्यांत आले. अमेरिकेच्या खालोखाल ब्रिटनच्या ६६९ बोलपटांना, रशिआच्या ३८ बोलपटांना, पाकिस्तानच्या ९ बोलपटांना आणि इतर देशांच्या १३३ बोलपटांना परवाने देण्यांत आले.

**संशोधनासाठी मदत**—सीलोनमध्यें एक शास्त्रीय-तांत्रिक संशोधन संस्था स्थापन करण्यासाठी जागतिक बँकेनें ५,००,००० रुपये मदत देऊं केली आहे असें समजतें. आर्थिक मदतीच्या जोडीस संस्थेच्या स्थापनेसाठी शास्त्रज्ञांचा एक संचहि बँकेनें देऊं केला आहे. सीलोनचें सरकार वर्षअखेर आपला निर्णय कळवील.

**सीलोनच्या व्यापाराचें नुकसान**—इजिप्तच्या सरकारनें चहाच्या आयातीसाठी परवाना देण्याचें धोरण अंमलांत आणल्यामुळें सीलोनचें नुकसान होणार आहे. इजिप्तकडून माल घेणाऱ्या अगर इजिप्तची हुंडणावळ स्वीकारणाऱ्या देशांकडूनच चहा आयात करण्याचे परवाने ह्यापुढे दिले जातील असें समजतें. सीलोन इजिप्तला २·४ कोटी पौंड वजनाचा चहा निर्यात करतें.

## बँकांचें एकत्रीकरण

### श्री. वर्दे ह्यांची मुलाखत

महाराष्ट्रीय बँकांच्या एकत्रीकरणाची सूचना श्री. जोग ह्यांनीं मांडली आणि तिचेवर बऱ्याच बँकर्सनीं आपआपले विचार व्यक्त केले. महाराष्ट्र बँकेचे एक संस्थापक, प्रारंभापासून व्हाइस चेअरमन, सारस्वत को. बँकेचे चेअरमन, मुंबई राज्य सहकारी बँकेचे ऑनररी मॅ. डायरेक्टर, इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे डायरेक्टर व रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर श्री. वा. पुं. वर्दे ह्यांचे ह्यासंबंधीं काय मत आहे, तें अजमावण्यासाठीं त्यांची "अर्था"च्या संपादकांनीं भेट घेतली. तेव्हां ते म्हणाले, "आपल्याकडील लहान बँका विशिष्ट कामगिरी चांगल्या तऱ्हेनें बजावीत आहेत. स्थानिक गरजा आणि स्थानिक पतवान कुळें ह्यांची त्यांना माहिती असल्यानें, त्यांच्या व्यवहारांस त्या बँकांचा चांगला उपयोग होत आहे. मोठ्या शहरांतील हेड-ऑफिसमधून, शाखांकरवीं, हें काम तितक्या चांगल्या प्रकारें पार पडणार नाहीं. लहान बँकांना जेथें शाखा चालविणें परवडतें, तेथें मोठ्या बँकांना परवडणार नाहीं. महाराष्ट्रांत मोठ्या बँका हव्यात, पण त्यासाठीं चांगल्या चाललेल्या लहान बँकांचें विलिनीकरण होणें इष्ट नाहीं. त्यांची जागा कोण घेणार? आणि पुन: मोठ्या बँकांची तरी व्याख्या काय? एकत्रीकरणाची आज तातडीची जरूरी आहे, असें मला वाटत नाहीं."

## त्रावणकोर-कोचीनमधील ग्रामोद्योग

त्रावणकोर-कोचीनच्या सरकारनें चालू फडणिशी वर्षांत ग्रामोद्योगांच्या विकासासाठीं १,०४,५२६ रुपये मंजूर केले आहेत. ही रक्कम हातमाग, मधमाशा पाळणें आणि तेलाच्या घाण्या ह्या उद्योगधंद्यांवर खर्च करण्यांत येणार आहे. सरकारनें ग्रामोद्योगांची चौकशी करण्यासाठीं एक बोर्ड नेमलें होतें. बोर्डाच्या शिफारसींप्रमाणें आतां ग्रामोद्योगांना उत्तेजन देण्यांत येत आहे. हातमागाच्या व्यवसायासंबंधीं बोर्डानें मुख्यत: दोन सूचना केल्या होत्या. त्यांपैकीं पहिली हातमागाच्या मालाला बाजारपेठेची निश्चिति प्राप्त करून देण्यासंबंधीं होती, आणि दुसरी त्या धंद्यांची सहकारी पायावर संघटना करण्यासंबंधीं होती. मधमाशा पाळण्याचा धंदा दुय्यम व्यवसाय म्हणून कसा किफायतशीर आहे तें लोकांना पटवून देण्यासाठीं बोर्डाच्या सूचनेप्रमाणें सरकार सध्या आपलें कार्य प्रचारापुरतेंच मर्यादित ठेवणार आहे. मधमाशा पाळणाऱ्या सहकारी संस्था शक्य तेथें काढण्यांत येणार आहेत. त्यांना धंद्याचीं उपकरणें घेण्यासाठीं पैशाची मदतहि देण्यांत येणार आहे. त्याशिवाय तज्ञांचा सल्लाहि देण्यांत येईल. ह्या धंद्याला मदत देण्यासाठीं सरकारनें चालू वर्षासाठीं ५,००० रुपये मंजूर केले आहेत. घाणीच्या धंद्यांतील सुधारलेल्या उत्पादनपद्धति शिकून येण्यासाठीं चार जणांना वर्ध्याला पाठविण्यांत येणार आहे. ह्या धंद्याची संघटनाहि सहकारी तत्त्वावरच करण्यांत येणार आहे. प्रत्येक सहकारी संस्थेला घाणी तयार करण्यासाठीं व इतर खर्चासाठीं १,००० रुपये देण्यांत येतील. तेलाच्या घाणीच्या धंद्यासाठींहि चालू वर्षी ५,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. खेड्यांतील लोकांना काम देण्याच्या दृष्टीनें अशा प्रकारच्या सहकारी ग्रामोद्योग संस्था इष्टच आहेत.

## वहातूक आणि बंदरें

राष्ट्राची वहातुकीची व्यवस्था आणि बंदरें ह्यांचा संबंध किती निकटचा असतो तें मद्रास बंदरासंबंधीं प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून दिसून येते. मद्रास राज्यांत लोहमिश्रित माती व मॅंगेनीझची माती मोठ्या प्रमाणावर आहे; आणि त्यांची निर्यात मद्रासच्या बंदरांतून होत असते. अलीकडे रेल्वेच्या वाघिणींचा तुटवडा पडूं लागल्यामुळें मद्रास राज्याच्या बंदरांतून पूर्वीपेक्षा निम्म्या मातीचीच निर्यात होऊं लागली आहे असें समजतें. त्यामुळें मद्रास बंदराचें माल निर्यात करण्याचें बंदर म्हणून महत्त्व कमी होऊं लागलें आहे. वरील दोन्हीं खनिजें अमेरिकेला निर्यात होत असतात. कलकत्ता आणि मुंबई ह्या बंदरांना माती वाहून नेण्यास अधिक वाघिणी मिळतात. म्हणून आतां बरीचशी निर्यात कलकत्ता, मुंबई व मार्मगोवा ह्या बंदरांतून होऊं लागली आहे. ही माहिती सांगतांना मि. लीफ हे अमेरिकन निर्यात व्यापारी म्हणतात कीं खाणींतून निघालेली माती मुबलक आहे. किंमतीहि वाजवी आहेत. पण वहातूक करण्यास पुरेशा वाघिणी मात्र मिळत नाहींत. ह्यासंबंधीं पुढीलप्रमाणें आंकडेवार माहिती मिळते. १९५०-५१ सालीं भारतानें धातू अगर त्यांची माती मिळून ८,०९,०९० टन माल निर्यात केला, त्यांपैकीं ५,५६,४९० टन निर्यात मद्रास बंदरांतून झाली. १९५१-५२ सालीं भारतानें ११,४३,३६० टन मालाची निर्यात केली. पण त्यांपैकीं अवघी ६,१०,३१२ टन निर्यात मद्रासच्या बंदरांतून झाली. मद्रासससारखें जवळचें बंदर असतांना राज्यांतील खनिजाची निर्यात लांबच्या बंदरांतून अधिक प्रमाणांत व्हावी हें चमत्कारिक तर दिसतेंच, पण शिवाय अनावश्यक वहातुकीच्या खर्चामुळें निर्यातीची परदेशीय किंमतहि वाढते हें लक्षांत घेतलें पाहिजे. कच्च्या मालाच्या किंमती उतरत चाललेल्या असतां अशी अव्यवस्था जास्तच दुष्परिणाम करणारी ठरण्याचा संभव आहे.

## अमेरिकेंत खेळण्यांच्या धंद्याला तेजी

अमेरिकेंत सध्यां मुलांचीं खेळणीं करणाऱ्या कारखान्यांना तेजीचे दिवस लाभले आहेत. अंतरिक्षांत प्रवास करून एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावर जाणाऱ्या अद्भुत माणसांच्या कथांनीं अमेरिकन मुलांचीं मनें अलीकडे भारावून गेलीं आहेत. त्यामुळें मुलांचीं खेळणीं तयार करणाऱ्या २,००० कारखानदारांचें चांगलेंच फावलें आहे. चालू वर्षअखेर हे कारखाने सुमारें ८०,००,००,००० डॉलर्स किंमतीचीं खेळणीं विकतील असा अंदाज आहे. टेलिव्हिजनवरील कार्यक्रमांत ग्रहांच्या दरम्यान उड्डाण करणाऱ्या धाडसी लोकांच्या रोमहर्षक गोष्टी दाखविण्यांत येतात. दररोज निदान १,००,००,००० अमेरिकन मुलें त्या कथा पहात असतात. कांहीं वर्षांपूर्वी आईबाप आपल्या मुलांना खेळणीं म्हणून तोफा, सुंदर बुटांच्या जोड्या, इत्यादि वस्तू घेत असत. पण आतां अंतरिक्षांत प्रवास करण्यासाठीं लागणारे पोषाख, उडत्या बशा उडविणाऱ्या तोफा, अशा प्रकारचें साहित्य अधिक खपूं लागलें आहे. बहुतेक खेळण्यांच्या दुकानांतून पुढील प्रकारचें साहित्य नमुन्यादाखल ठेवण्यांत आलेलें दिसून येतें. ७ फूट उंचीचें रॉकेट शिप, तें जुळविण्याविषयींच्या सूचना पेटीवर लिहिलेल्या असतात. तोंडांतून तीन रंग चमकविणाऱ्या किरण-तोफा, दोन ग्रहांत बातचीत करतां येण्यासारखा टेलिफोन. ह्या टेलिफोननें बॅटरीशिवाय अर्धा मैल अंतरापर्यंत उलटसुलट दिशेनें संभाषण करतां येतें. अंतराळीं गस्त घालणाऱ्या शिपायांसाठीं एक पिस्तुल तयार करण्यांत आलें आहे. ते आपल्या नळींतून रबराचे बाण अचूक नेमानें सोडूं शकतें.

# अर्थ

बुधवार, ता. ३ डिसेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उद्यांच्या बँकिंगची दिशा

गेल्या रविवारीं व सोमवारीं पुणें येथें बँकिंगविषयक प्रदर्शन भरविण्यांत आलें व व्याख्यानमाला गुंफण्यांत आली, त्यावेळीं शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांच्या हस्तें "बँका—काल, आज व उद्यां"* ह्या पुस्तकाचें प्रकाशन करण्यांत आलें. ह्या पुस्तकाचें संपादन "अर्थ"च्या संपादकांनीं केलेलें असून त्यांत शेवटीं "उद्याच्या बँकिंगची दिशा" हा स्वतंत्र लेखहि लिहिला आहे. पुस्तकांतील पहिल्या कांहीं प्रकरणांतून बँकांच्या पूर्वींच्या व आजच्या परिस्थितीची आकडेवार माहिती देण्यांत आली असून शेवटच्या प्रकरणांत बँकिंगच्या इष्ट मार्गाचें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. त्या लेखांतील सर्व सूचनांचा व विचारांचा परामर्श येथें घेतां येणें शक्य नाहीं. रिझर्व्ह बँकेनें अधिक कृतिमान व्हावें, असें त्यांत प्रतिपादन करण्यांत आलें असून पैसेवाल्या नव्या वर्गास बँकिंगची संवय लागण्याची आवश्यकता सांगितली आहे. हुंड्यांचा अभाव कां आहे आणि रिझर्व्ह बँकेची योजना उत्पादक वर्गास उपयोगी कां पडत नाहीं, ह्याचें विवेचन करण्यांत आलें आहे. बँकेचें अंतिम स्थैर्य तिच्या कर्जदारांच्या पतीवर आणि सचोटीवर अवलंबून असतें, ह्या दृष्टीनें संचालकांना, व्यवस्थापकांना आणि कर्जदारांना केलेल्या सूचना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. बँकिंगचें राष्ट्राच्या आर्थिक उद्धाराच्या प्रयत्नांतील स्थान कोणतें, हेंहि लेखकानें स्पष्ट केलें आहे. बँकांच्या परस्पर-सहकार्याबद्दल व्यक्त केलेले विचार येथें देणें उचित होईल.

बँकांमध्यें सध्यांपेक्षा कितीतरी अधिक सहकार्यास वाव आहे. चार बँकांचे चालक एकत्र येऊन बोलू-चालू-हिंडू लागले, हीहि एक मोठी अशक्यप्राय गोष्ट झाली, असें मानण्याइतक्या प्राथमिक अवस्थेंत सध्यांच्या सहकार्याची परिस्थिति आहे. बँका-बँकांमध्यें स्पर्धा असली तरी तिची पातळी अत्युच्च राखून, सर्वांच्याच हिताच्या गोष्टीसाठीं बँकांनीं योजना आखून पार पाडणें बँकिंगच्या व्यवसायाच्या हिताचें होईल. सर्व बँका सुस्थितींत असतांनाहि परस्पर-सहकार्य जर कठीण वाटतें तर अडचणीचे प्रसंगीं, म्हणजे ज्यावेळीं त्याची आवश्यकता अतिशय मोठी त्यावेळीं, तें एकदम कसें अवतरणार? कर्जदारांबद्दल एके ठिकाणीं माहिती उपलब्ध होण्याची व्यवस्था झाल्यास बँकांची बरीच मोठी चिंता दूर होईल. कांहीं विशिष्ट कामापुरत्या द्यावयाच्या जाहिरातींत कांहीं बँका गटानें एकत्र झाल्या तरी सुद्धां पुष्कळच प्रगति झाली, असें म्हणतां येईल. एका बँकेंतील ठेवी दुसऱ्या बँकेनें आकृष्ट केल्यानें बँकिंगची वाढ होत नाहीं; नवे ठेवीदार किती निर्माण केले ह्यावरच बँकिंगची वाढ अवलंबून आहे, हे सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचे उद्गार अत्यंत मननीय आहेत. डेक्कन बँक्स असोसिएशन व पुणें बँकिंग असोसिएशन ह्यांनीं केलेला प्रदर्शन—व्याख्यानें—पुस्तिका ह्यांचा उपक्रम येथील बँकांच्या परस्पर—सहकार्याची मुहूर्तमेढ ठरो व बँकिंगच्या व्यवसायाची दृढ पायावर वाढ होऊन जनतेच्या आर्थिक उद्धारास त्याचा प्रभावी हातभार लागो, अशी प्रार्थना आहे.

* डेक्कन बँक्स असोसिएशन व पुणें बँकिंग असोसिएशन ह्यांचें प्रकाशन, पृ. सं. १०६.

---

## ब्रिटनचें बदलतें चित्र

गेल्या वर्षीं ब्रिटनमध्यें जी शिरगणती करण्यांत आली, तीवरून असें दिसून येत आहे कीं, ब्रिटनमधील मुलांची संख्या कमी होत चालली आहे. १,४५,००,००० कुटुंबांची तपासणी करतां त्यामधील ५७ टक्के कुटुंबांत १६ वर्षांखालील एकहि मूल नव्हतें असें आढळून आलें. ३१,००,००० कुटुंबांतून फक्त एकच मूल होतें. ४५ वर्षांच्या आंतील स्त्रियांत फक्त ४·४ टक्के स्त्रियांना ५ अगर त्यापेक्षा अधिक मुलें होतीं. १९११ सालीं अशा स्त्रिया २१·९ टक्के होत्या. कॉमनवेल्थ गटांतील राष्ट्रांचे जे नागरिक ब्रिटनमध्यें रहातात त्यांत भारतीयांची संख्या अधिक आहे असें दिसून आलें. कॉमनवेल्थमधील राष्ट्रांचे एकूण ३,८३,००० नागरिक ब्रिटनमध्यें रहातात. त्यांपैकीं सर्वांत मोठा गट १,३७,००० भारतीयांचा आहे. भारतीयांच्या संख्येपेक्षा पोलंडमधून परागंदा झालेल्या नागरिकांची संख्या मात्र अधिक आहे. असे १,६५,००० नागरिक आहेत. ब्रिटनच्या समाजव्यवस्थेंत पडलेल्या फरकाचें एक गमक म्हणून घरकाम करणाऱ्या नोकरांच्या संख्येकडे बोट दाखवितां येईल. १९३१ मध्यें असे नोकर ७,०६,८०० होते. आतां अवघे १,७८,००० आहेत. फक्त ३,१०० कुटुंबांना तीन किंवा अधिक नोकर ठेवणें परवडतें. म्हणजे, ४५० कुटुंबांतून एका कुटुंबाजवळच इतका पैसा आहे. शाळेंत जाणाऱ्या मुलांसंबंधीं पुढील अवस्था दृष्टोत्पत्तीस येते: ५ ते १५ वर्षपर्यंतच्या वयाचीं ६८,००,००० मुलें शाळेंत जात होतीं. १६ ते १९ पर्यंतच्या गटांतील ३९,००० मुलें शिक्षण घेत होतीं. २० ते २४ वर्षांच्या गटांतील ८७,००० मुलें शिकत होतीं आणि २४ वर्षांच्या वरील ३०,००० तरुण शिक्षण घेत होते. घरकाम करणाऱ्या नोकरांची घटलेली संख्या आणि मुलांचें उतरतें प्रमाण, ह्या दोन गोष्टी ब्रिटनमधील बदलत्या समाजरचनेच्या विशेष निदर्शक दिसतात.

---

## तांदळाचा जागतिक पुरवठा वाढणार

१९५२—५३ च्या मोसमांत तांदळाचें जागतिक उत्पादन १७·६ कोटी टन होईल, असा अंदाज अमेरिकेच्या शेतकी खात्यानें केला आहे. १९५१—५२ च्या मोसमांतील उत्पादनापेक्षा हा आकडा ८० लक्ष टनांनीं मोठा आहे. जपान, अमेरिका व इटली ह्या देशांतील उत्पादन वाढ सर्वांत ज्यास्त होईल. युरोपियन देशांतील उत्पादन १२% वाढेल आणि उत्तर अमेरिकेंतील वाढ ८% भरेल. भारत, पाकिस्तान, इंडोचायना, बर्मा व सिलोन ह्यांतहि उत्पादनवाढ अपेक्षित आहे.

## जमीनमालकांवर घातलेली कुऱ्हाड

### नवीन हुकूम स्थगित करा

( लेखकः—श्री. गो. त्रिं. सराफ, बी. ए., एलएल. बी., बेळगांव )

ता. १३।११।५२ चे मुंबई सरकारचे गॅझिटांत, बाँबे टेनन्सी व ॲग्रिकल्चरल लँडस ॲक्ट १९४८ यांतील ६ व्या कलमाच्या पोटकलम २ अन्वयें मिळालेल्या अधिकारानुसार, असें ठरविण्यांत आलें आहे कीं, बागाईत वा जिराईत जमिनींच्या कुळानें जास्तींतजास्त, पिकाच्या ⅙ हिस्सा, खंड म्हणून मालकांस देणेचा आहे. या हुकुमाचा अंमल शेड्यूलमध्यें नमूद केलेल्या १४ जिल्ह्यांत लागलींच होणेचा आहे. ( इतर जिल्ह्यांना लागू न करण्याचें कांहींच कारण दिलेलें नाहीं. )

आमच्या देशाची उन्नति होण्याच्या मार्गांतील एक मुख्य अडचण म्हणजे शेतकऱ्याचें दारिद्र्य, व शेतकरी सुखी तर देश सुखी, या दोन सत्यांवर योग्य उपाय म्हणून काँग्रेसनें अधिकारपदावर येतांच, शेतीच्या व्यवस्थेबाबत मूलगामी पद्धतीचे कायदे अमलांत आणले. त्यांतील महत्त्वाचे म्हणजे, १९४८ चा कूळकायदा, तुकडे प्रतिबंधक कायदा, हे होत. प्रारंभींचा या कायद्याचा उद्देश रयतवर्गाला होणारा अन्याय व जाच दूर करणें, उत्पादनाच्या दृष्टीनें निरुपयोगी असे जमिनीचे तुकडे होऊं न देणें व अधिक उत्पादनास उत्तेजन देणें असा योग्य तोच होता. कूळकायद्यान्वयें कुळांना जमिनी खंड देइतोंपर्यंत त्यांचेचकडे राहण्याचें संरक्षण मिळून, जमीन योग्य किंमतीस विकत घेण्याचा किंवा मागण्याचाहि अधिकार प्राप्त करून देण्यांत आला. खंडाचें प्रमाण पिकाच्या ⅓ हिस्सा कमाल निश्चित केला गेला.

या सर्व कायद्यामुळें, जमीनमालकांचे व कुळांचे संबंध कांहीं ठिकाणीं तेढीच व भांडणें वाढण्यांत झाले, तरी मालकांच्या मूलभूत हक्कावर गदा पडण्याइतकें त्यांचें स्वरूप भेसूर नव्हतें. समजस मालक व कूळ यांचे संबंध आत्मीयतेचेच राहिले. आचार्य विनोबा भावे यांनीं सुरू केलेल्या भूदान यज्ञाच्या उदात्त उपक्रमाकडेहि जमीनमालक सहानुभूतीच्या दृष्टीनेंच पहात होते. परंतु या नवीन हुकुमामुळें मात्र जमीनमालकांच्या अस्तित्वालाच घाला घालण्याइतपत सरकारनें मजल मारली असून त्यास तांतडीनें तहकुबी न दिल्यास, देशाची आर्थिक घडीच विसकटून लक्षावधि कुटुंबांना निर्वासित म्हणून आपल्याच गांवांत हिंडत रहाण्याचा दुर्धर प्रसंग येऊन ठेपला आहे.

अशा प्रकारचा हुकूम काढण्यांत, आपला हेतु ' कसेल त्याची जमीन ' हें तत्त्व प्रस्थापित करण्याचा आहे असें रेव्हेन्यू मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं अलिकडच्या त्यांच्या दौऱ्यांत सांगितल्याचें समजतें. या हुकुमामुळें आश्चर्याचा व खेदाचा धक्का जमीन—मालकांनाच बसला असें नसून काँग्रेस पक्षाच्या असेंब्लीचे सभासदांनाहि बसला आहे. कारण या हुकुमाची त्यांना कोणतीच कल्पना देण्यांत आली नव्हती. श्री. भाऊसाहेब हिरे यांच्या बेळगांव जिल्ह्यांत नुकत्याच झालेल्या दौऱ्यांत येथील काँग्रेस पक्षाच्या आमदारांनीं त्यांना जमिनीचा खंड ⅙ करण्याबाबत आपण कोठें बोललां काय ? असें विचारतांच "कांहो ! तो हुकूम गॅझेटहि झाला आहे" असें त्यांनीं उत्तर दिल्याचें सांगतात, आणि ता. १३ तारखेच्या गॅझेटांत तो येऊनाहि खरा झाला आहे.

अशा अत्यंत मूलगामी व परंपरागत चरितार्थाचे संबंध जेथें निगडित झाले आहेत, अशा एका महत्त्वाच्या बाबींत केवळ एका ( किंवा सर्व ) मंत्र्यांच्या उतावळेपणानें घेतलेला कोणताहि निर्णय कायद्याच्या कक्षेंत आहे असें मानलें तरी, अशा आकस्मिकपणें गॅझेटांतील हुकुमान्वयें तो अमलांत आणणें न्यायाचें व इष्ट आहे असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. आमच्या काँग्रेस सरकारचें ध्येय वेल्फेअर स्टेट व सर्वोदय अशा उदात्त स्वरूपाचें असतां अशा प्रकारचे झोटिंगशाही हुकूम काढून प्रजेचें हितसंवर्धन नव्हे तर नव्हेच, हितसंरक्षण तरी करण्यांत आलें आहे असें कोणी सुजाण मतदार मान्य करील काय ? सर्वोदय याचा अर्थ एकाचा उदय व दुसऱ्याचा लोप किंवा अस्त असा कोठें करण्यांत येतो काय ? सर्वोदय तेव्हांच कीं ज्यांत सर्वांचीच सारखी उन्नति होण्यास वाव आहे. सुस्थितींत नव्हे, साधारण स्थितींत असलेल्या एकाचें जबरदस्तीनें काढून दुसऱ्यास देणें हा समन्वय कसा म्हणतां येईल आणि मुख्य म्हणजे, जेथें या सर्व घटना कायदेमंडळाच्या संमतीनेंच होणें इष्ट व न्यायाचें ठरणार आहे, तेथें कायदेमंडळ तर सोडाच, काँग्रेस पक्षाच्या सभासदांचीहि संमति न घेतां काढण्यांत आलेला हुकूम हा अयोग्यच म्हटला पाहिजे.

आमच्या मंत्र्यांना जर कसणाऱ्याची जमीन करून देण्याची तीव्र इच्छा असेल, तर त्यांनीं उघडपणें जमीनमालकांना तसें सांगून त्यांच्याकडील जमिनींची योग्य किंमत ठरवून ती सर्वांनाच मान्य होईल अशा रीतीनें देणें हाच मार्ग सर्वोदयाच्या व वेल्फेअर स्टेटच्या घोषणेस अनुसरून होणारा आहे. अशा प्रकारें जमीनमालकांस किंमत देतां येणें सरकारास जादा बोजा न पडतां शक्य होणार आहे हें खात्रीपूर्वक दाखवून देतां येईल. त्यांनीं फक्त धिमेपणाचा मार्ग अवलंबावा एवढीच नम्र विनंती आहे. न पेक्षा सध्यांप्रमाणें ⅙ किंवा उद्यां आणखी कांहीं कमीजास्त खंडाचें प्रमाण लहरीप्रमाणें ठरवून, मालकांना हैराण करून जमिनीचें स्वामित्व सोडण्यास भाग पाडणें हें दुष्टपणाचें व हिंसात्मक ठरणार आहे. यापेक्षा उघडपणें निवडणुकीच्या जाहीरनाम्यांतून बिनमोबदला जमिनी कुळांना देवविणार अशी घोषणा करणारे सोशालिस्ट व कम्युनिस्ट जास्त प्रामाणिक ठरत नाहींत काय ?

अशाप्रकारें घाईचे हुकूम काढून, रयतवर्गाच्या आकांक्षा बेसुमार वाढवून ठेवल्यावर खुद्द सरकारलाहि परिस्थिति आवाक्यांत ठेवणें शक्य होणार नाहीं. अशा मार्गानें कोणत्याहि वर्गाचें हित सपादतां येणार नसून धान्योत्पादनहि वाढण्याची आशा वाटत नाहीं. जमिनीच्या उत्पन्नापासून येणारें चलन, आर्थिक नियोजनाची संवय व ज्ञान नसलेल्या वर्गांत अनुत्पादक बाबींकडे गोठल्यामुळें सरकारनें कराचें उत्पन्न घटत असल्याचा, मध्यमवर्ग बहुंशीं निर्वासित व बेकार झाल्याचा, उत्पादक धंदे, बँका व इन्शुरन्स कंपन्या यासारख्या राष्ट्रांच्या अर्थवाही धमन्या आंखडत चालल्याचा किंबहुना आपल्या देशाची आर्थिक घडीच उधळून गेल्याचा, कटु अनुभव येणार आहे.

तरी एवढीच विनंती कीं, हा नवीन हुकूम तूर्त तहकूब ठेवून काँग्रेस पक्षांत व नंतर असेंब्लीपुढें रीतसर योजना मांडून पूर्ण विचारांतीं निर्णय घेणेंच देशहिताचें होणार आहे. रयतवर्गाचें सुख संपादणें जरूर आहे याबद्दल देशांत एकमतच होईल. जमीन कसणाऱ्याकडे जाणें आवश्यक आहे हेंहि बहुसंख्य जमीनमालकांस मान्यच झालें आहे. फक्त कोणावरहि जबरदस्ती किंवा अन्याय न होऊं देणें हें पहाण्याची जबाबदारी सरकारवर आहे. तरी ती सर्व वर्गांना संमत होईल अशा रीतीनें पार कशी पाडतां येईल याचा योग्य विचार होण्यासाठी असेंब्लीच्या सभासदांनीं एकत्र येऊन विचार करणें अगत्याचें आहे व तोंपर्यंत तरी हा हुकूम स्थगित करण्याची विनंती आमचे सर्व आमदार बंधू व सुजाण मतदार मंत्र्यांना करून त्यांचें मन वळवतील अशी बळकट आशा वाटते.

## महाराष्ट्रांतील बँकांचें एकत्रीकरण वा विलिनीकरण

( लेखक—श्री. बी. बी. पाटील, वकील, सांगली. )

महाराष्ट्रांतील छोट्या बँकांचें एकत्रीकरण वा विलीनीकरण करून सामर्थ्यवान मध्यवर्ति अशी एकच बँक असावी अशी विचारसरणी दिवाळीच्या "अर्था"च्या अंकांत श्री. जोग यांनीं जनतेसमोर विचारासाठीं मांडली व त्यासंबंधीं चर्चा चालू आहे. बंगालमधील कांहीं बँकांचें एकीकरण झालें व राजस्थानांतील कांहीं बँका बंगालमधील बँकांचें अनुकरण करूं पहात आहेत. महाराष्ट्रांतील बँकांनींहि या उपक्रमाचें अनुकरण करावें, ही विचारसरणी या चळवळीच्या मुळाशीं आहे.

बंगालमधील एकत्रित आलेल्या बँकांपैकीं कोणतीहि बँक, महाराष्ट्रांतील कोणत्याहि एका बँकेपेक्षा मोठी होती. त्या बँका लहान होत्या म्हणूनच त्या परस्परांत विलीन झाल्या असें म्हणतां येणार नाहीं. विलिनीकरणाची वाट चोखाळूं लागलेल्या राजस्थानांतील बँका लहान व छोट्या आहेत, असेंहि म्हणतां येणार नाहीं. बँक ऑफ इंग्लंड, वर्ल्ड बँक, वगैरेंसारख्या बँकांशीं तुलनाच करावयाची झाल्यास भारतांतील ज्या आठ बँकांची मोठ्या बँकांत गणना केली जाते, त्यासुद्धां अफाट सागरांतील एका बिंदूप्रमाणें ठरतील असें म्हणावें लागेल. या दृष्टीनें विचार करतां छोटी व मोठी ही शब्दयोजना सापेक्ष आहे.

अफाट जगाचें राजकारण एकसूत्री चालावें असें म्हणणारे कांहीं आहेत. अखिल भारताचें एकच पार्लमेंट असावें व त्या पार्लमेंटच्या सत्तेखालीं सगळा कारभार चालावा, हल्लीं जीं निरनिराळीं राज्यें वा प्रांत आहेत व दरेक प्रांतासाठीं कायदेमंडळें आहेत, तीं नष्ट करावींत; खर्चाच्या दृष्टीनें व राज्यकारभाराच्या दृष्टीनें असें करणें सोईचें होणार आहे, असें म्हणणारा एक वर्ग आहे. इंग्लंडकडे या बाबतींत बोट दाखविलें जातें. याउलट हल्लीं असलेल्या केंद्रीकरण सत्तेचें विकेंद्रीकरण करावें, दरेक खेड्याचा राज्यकारभार त्या त्या खेड्यांतील जनतेनें करावा, अशा विचारसरणीचे लोकहि कांहीं थोडेथोडके नाहींत.

### भिन्न भिन्न विचारसरणींचीं कारणें

नाण्याला दोन बाजू आहेत. तद्वतच अशा विचारसरणींतहि दोन बाजू आहेत. नाण्याची किंमत त्यावरील एका बाजूवरून ठरत नाहीं. नाण्याची किंमत त्याच्या आकारावरून व त्यांत संमिश्र केलेल्या धातूवरून ठरविली जाते. आकार लहान-मोठा व त्यांतील धातूंचें प्रमाण निरनिराळें यामुळें त्याची किंमत ठरविली गेली आहे. भारतांतील एक रुपया नाण्याची किंमत पाकिस्तानांत अनेक कारणांमुळें १३।१४ आणे मानली जाते. कमी किंमतीच्या नाण्याची त्याच्या आयुष्यांत अनेकवेळां हातपालट होते. त्या मानानें रुपयाची कमी होते. एक रुपयाची नोट अनेकवेळां या हातांतून त्या हातांत जाते. त्यामानानें शंभर रुपये किंमतीच्या नोटेवर हा प्रसंग कमी येतो. लहान किंमतीच्या नाण्याचा अनेकांना नित्य व्यवहारांत वापर करावा लागतो. किंमतीच्या दृष्टीनें क्षुल्लक पण उपयुक्ततेच्या दृष्टीनें मुल्यवान परंतु हरकामी व हरघडीस उपयुक्त अशी ही चीज आहे. आणेली हरवली अगर झिजली तर ना संत ना खेद. आणेली झिजली आहे म्हणून ती घेऊन नवीन या म्हणून मुंबईच्या टांकसाळीकडे कोणी जात नाहीं. एका रुपयाची नोट मळली वा खराब झाली म्हणून न.शिकच्या नोटा छापणाऱ्या छापखान्याकडे कोणी धांव घेत नाहींत. गरिबांतला गरीबसुद्धां झालें तें होऊन गेलें, यानें काय होणार आहे, अशा हिंमतीनें पुढील उद्योगास लागतो. छोट्या मोठ्या नाण्यासंबंधीं जी विचारसरणी तीच विचारसरणी छोट्या बँकांसंबंधीं लावली तर त्यांत चूक होईलच असें नाहीं.

नाण्यालाच काय पण प्रायः सर्वच वस्तूंना दोन अगर अनेक बाजू आहेत. कांहीं फुलें डोळ्याला सुंदर दिसतात परंतु नाक त्यांना पुढें घेत नाहीं. कांहीं फळें डोळ्याला मोहक दिसतात पण जीभ त्यांना जवळ येऊं देत नाहीं. गोरागुमटा व सदृढ प्रकृति म्हणून दिसावयाला आकर्षक, पण त्याचें मन दगडी कोळशापेक्षाहि काळें. यामुळेंच प्रायः सर्वच वस्तूंना एकापेक्षा अधिक बाजू असतात असें समजलें जातें. छोट्या बँकांकडे पाहतांनाहि अशाच अनेक बाजू आहेत. छोट्या नाण्याप्रमाणें त्या अनेकांना, विशेषतः छोट्यांना त्या उपयुक्त वाटणार आहेत. छोट्यांचीच संख्या मोठी आहे. मोठ्या बँकांतील खातेदार मोठे, तेथें सर्वच मोठे. देवळांत जातांना पादत्राण बाहेर ठेवून नम्रपणें आंत जावें, घंटा वाजवून देवाला जागे करावें तेव्हां कोठें देवाचें व पुजाऱ्याचें दर्शन घडणार. तद्वतच मोठ्या बँकेंत जाणाऱ्या छोट्या गिऱ्हाइकांना अनुभव येणार नाहीं काय ?

### छोट्या बँकांच्या स्थापनेचीं कारणें

छोट्या बँका जन्मास कां आल्या, त्या वाढल्या कां व आजवर जिवंत कां राहिल्या ? याच्या इतिहासाचें व कार्यकारणभावाचें अध्ययन केल्यास काय दिसून येईल ? मागणी तसा पुरवठा हें तत्त्व मुळींच लागू पडणार नाहीं. कोणत्याहि चांगल्या गांवचे उदाहरण घ्या. तेथें चांगली जुनी, त्यांतल्या त्यांत मोठी व मातब्बर बँक अस्तित्वांत असतां तेथें दुसऱ्या अनेक बँका कां निघाल्या ? इतर बँकांत ज्या ठेवी आल्या व धंदे सुरू झाले, त्या सर्वच ठेवी त्या जुन्या बँकेंत कां गेल्या नाहींत व इतर बँकेंतील सर्वच व्यवहार त्या जुन्या बँकेशींच कां झाले नाहींत ? ती जुनी बँक अनेकांच्या विश्वासास पात्र ठरली नव्हती असें नाहीं. सगळ्यांची गरज भागविण्यास ती समर्थ असतां दुसऱ्या बँका कां निघाल्या व काढल्या, याचा विचार करावयास नको काय ? या नव्या बँकांचीं कांहीं निराळीं वैशिष्ट्यें होतीं, निराळें धोरण होतें व त्यांची उपयुक्तता निराळी होती म्हणून तेथेंहि भागीदार आले, भांडवल गोळा झालें, इतरहि गिऱ्हाईक जमलें व त्यांचे व्यवहार सुरू झाले. केवळ जुन्या बँकांच्या द्वेषावर नव्या बँका जन्मास आल्या असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होईल.

महाराष्ट्रांतील ज्या बँकांनीं एकत्र यावें असें श्री. जोग यांनीं सुचविलें आहे, ती यादी अखेरची व पुरी आहे, असें मी समजत नाहीं. उदाहरणार्थ म्हणून कांहींचा नामनिर्देश केला असावा असें मी समजतों. श्री. जोग यांनीं नामनिर्देश केलेल्या व आणखी कांहीं बँका एकत्र आल्या अशी क्षणभर कल्पना केली तर इतर ज्या छोट्या बँका शिल्लक राहतील त्यांची अवस्था काय होईल ? तसेंच आजच्या बँकांचें एकत्रीकरण म्हणजे यापुढें दुसरी नवी बँक काढूच नये अगर निघूच नये असें होईल. याचा अर्थ हा कीं, भावी पिढ्यांना हा एक चांगलाच कोलदांडा होऊन बसेल. त्यांच्या महत्त्वाकांक्षा नष्ट केल्याचें श्रेय आपण जोडावयाचें काय ?

दुसरें असें कीं, आज लहान दिसणाऱ्या बँका अधिक मोठ्या करण्याचा प्रयत्न करणें शक्य नाहीं काय ?. खेडोंपाडीं भूमिगत पैसा कांहीं थोडाथोडका नाहीं. बँकेंत पैसा ठेवा अशी जोराची चळवळ झाली, तर लाखों रुपये बँकेकडे येतील. यामुळें अशा जनतेचा व राष्ट्राचाहि फायदा होईल. छोट्या बचत-योजनेंतील बरीच रकम अशा लोकांची आहे. नव्या निघालेल्या कांहीं बँकांतील ठेवी शेतकऱ्यांच्या आहेत. वर सांगितल्या-

प्रमाणें चळवळ झाल्यास १०१५ कोटी रुपये महाराष्ट्रांतील बँकांची वाट चालू लागतील.

### चळवळ कशाची हवी ?

खेड्यांतील जनतेला बँकिंगची मुळीं संवयच नाहीं. बँकांची ओळख नाहीं. खेड्यांतील जनतेपैकीं अनेकांकडे थोडीफार शिल्लकी पुंजी आहे. सावकारी नियंत्रणादि अनेकविध कायद्यांतील निर्बंधांमुळें पूर्वीसारखे हातउसनवार व्यवहार प्रायः बंद झाले आहेत. तें द्रव्य भूमिगत करून अगर सोन्यांत रूपांतर करून सुरक्षित ठेवण्याची परंपरा फार जुनी आहे. या संवयी क्षणार्धात नष्ट होणार नाहींत. अशा रकमा बँकांची वाट चालू लागाव्यात म्हणून दीर्घ प्रयत्न करणें जरूर आहे. नुसत्या पोंचपावतीवर पैसे बँकांचे स्वाधीन करण्यास ते धजत नाहींत. पैसा घेणार कोण ? बँकेचा मालक कोण ? पैसे घेतल्याबाबत रजिष्टर कागद नाहीं, अशा अनेकविध शंका केवळ अज्ञानामुळें निघतात. बँकेची घटना, त्याचें महत्त्व व सुरक्षिततेबद्दल त्यांची खातरजमा होत गेल्यास बँकांकडे पैशाचा प्रवाह सुरू होत जाईल. एकवार आलेल्या रकमा प्रायः तावडतोब परतत नाहींत असा थोडाफार अनुभव आहे. याबद्दल योग्य ती चळवळ होत राहील तर आज छोट्या दिसणाऱ्या बँका थोड्याफार मोठ्या होतील. एकवार त्यांचेवर विश्वास बसला व तो वाढीस लागला तर त्यांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या बँका अधिकाधिक मोठ्या होत राहतील.

व्यापाऱ्याकडे रोज कांहींना कांहीं रकम शिल्लक असते. अगदींच जरूरीपुरती रकम दुकानाच्या तिजोरींत शिल्लक ठेवावयाची व बाकीची बँकेच्या तिजोरींत शिल्लक ठेवावयाची. असा प्रघात पडत जाईल तर बँकेचें खेळतें भांडवल वाढत राहील. अशा पोषक चळवळी कां करूं नयेत ?

### तत्त्व आणि व्यवहार

नव्या बँकांचें उत्पादक व तेथील ग्राहक यांनीं आपला राजकीय पक्ष, जात, गोत, धर्म व इतर संबंध विसरले असतील असें मानणें चुकीचें होईल. श्री. जोग यांनीं इकडील १०१५ बँकांतील व्यवहाराची माहिती जरूर घ्यावी. याच बँका काय, पण सहकारी तत्त्वावर चाललेल्या बँकांतील व्यवहाराकडेहि या दृष्टीनें पाहून आपला निर्णय घ्यावा. बँकांतील व्यवहारापुरतेंच हें असें आहे असें नाहीं, तर हा अनुभव दुकानदारींत, डॉक्टरींत, वकीलींत व इतर अनेक ठिकाणीं आहे. ही परिस्थिति अराष्ट्रीय आहे व विघातक आहे असें नाहीं. हा भावनेचा, श्रद्धेचा, विश्वासाचा व आपुलकीचा प्रश्न आहे. तत्त्व व व्यवहार, विचार व आचार, शहरें आणि खेडीं, यांतील भेदाभेदांचा विचार न झाल्यानें तात्त्विक बोल तेवढे बोलले जातात, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

सामिलीकरणाचे फायदे अज्ञात नाहींत. मात्र हे फायदे पदरांत पाडून घेणेसाठी विलीनीकरण हाच एकमेव मार्ग आहे, असें मात्र मुळींच म्हणतां येणार नाहीं. मोठ्या बँकांनीं लहान शहरांतून आपल्या शाखा कां उघडाव्यात ? येथें अशा बँकांचा नामानिर्देश करण्याची जरूरी नाहीं. परंतु परप्रांतांतील बँकांनीं महाराष्ट्रांत आपल्या शाखा कां उघडाव्यात अगर महाराष्ट्रांतील बँकांनीं तरी आपले भागीदार जेथें नाहींत, तेथें शाखा कां सुरू कराव्यात ? महाराष्ट्रांत सामर्थ्यवान अशी एकच बँक असावी, महाराष्ट्रांच्या आर्थिक जिवनांत यामुळें मदत होईल, असें म्हणणें हें ठीक आहे. बँकांनीं हा अभिमान धरावा. हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवावें. महाराष्ट्रियांना हा अभिमान असतां, हें त्यांचें ध्येय असतें, तर परप्रांतीय बँकांच्या शाखांना आपल्या रस्त्यानें परत जावें लागलें असतें. एकच मध्यवर्ति बँक झाली तर आमचा उपक्रम थोडाच बदलणार आहे ? अशी वस्तुस्थिति असतां केवळ तत्त्वाचें अवलंबन करण्यांत व वस्तुस्थितीकडे डोळेझांक करण्यांत स्वारस्य तें कोणतें ?

गरीब व दरिद्री महाराष्ट्रांतील बँकांहि तशाच असणार नाहींत ? महाराष्ट्रियांना या बँकांचा अभिमान व या बँकांबद्दल आपुलकी वाढेल तर त्या मोठ्याहि होतील. महाराष्ट्र बुद्धिवान आहे असें म्हटलें जातें. विलीनीकरणाची चळवळ अशा बुद्धिवंतांचीच नव्हे का ?

---

## धान्याचीं व पैशाचीं पिकें

संपादक " अर्थ " यांस स. न. वि. वि.

श्री. न. स. जोशी यांचा लेख वाचला. मला त्या लेखावरून जे कांहीं विचार सुचले ते लिहून पाठवीत आहे.

त्यांचा मूळ मुद्दा असा आहे कीं, कालवे व पाटबंधारे बांधून दुष्काळी परिस्थिति आटोक्यांत येत नाहीं. याला कारण कालव्याच्या टापूंतील शेतकरी धान्याचीं पिकें पेरत नाहींत.

पण याच्या मागचा इतिहास ते पहात नाहींत. अगदीं साधी गोष्ट घ्या. त्यांना जर कुणी ( मी इथें नोकरीचें उदाहरण घेतों, कारण ते नोकर होते. ) रु. ५०० ची नोकरी देऊं केली तर ते २०० ची नोकरी तावडतोब सोडून देतील.

हींच गोष्ट कालव्याच्या पाण्यावर जर पैशाचें व धान्याचें पीक घेतलें तर त्यांच्या उत्पन्नाच्या बाबतींत खालील तक्त्यावरून किती फरक पडतो हें आपणांस कळून येईल.

| पिकाचें नांव | | चालू बाजारभावानें जास्तींत जास्त उत्पन्न. दर एकरीं |
|---|---|---|
| बाजरी | ... | रु. १५०-०-० |
| ज्वारी | ... | रु. २००-०-० |
| गहूं | ... | रु. २२५-०-० |
| भुईमूग | ... | रु. ३२५-०-० |
| कपाशी | ... | रु. ३१०-०-० |
| ऊंस | ... | रु. १,५००-०-० |

वरील तक्त्यावरून पहिली गोष्ट कोणती लक्ष्यांत येत असेल तर ती ही कीं, बागायत अगर कोरडवाहू कोणतेंहि पीक घेतलें तरी धान्याच्या पिकांचें उत्पन्न कमी येतें. मग शेतकऱ्यानें तरी धान्याचीं पिकें कां पेरावींत ?

आतां आपण दुसऱ्या गोष्टीकडे वळूं या. पूर्वी जेव्हां कापडावर व साखरेवर कंट्रोल होता त्यावेळेस कारखानदारांना उत्पन्नाच्या ३०% माल कोणत्याहि भावानें विकण्याची परवानगी होती. मग हींच सवलत आमच्यासारख्या गरीब शेतकऱ्यांना कां नको ? मग शेतकऱ्यांना तरी अधिक धान्य पेरण्याचा उल्हास कुठून येणार ? नुसतें पोस्टर्स व "अधिक धान्य पिकवा" मोहीम सुरू करून धान्य जास्त पिकणें कसें शक्य आहे ?

जर सरकारला खरोखरच अधिक धान्य शेतकऱ्यांनीं पेरावें असें वाटत असेल तर सरकारनें धान्याचीं पिकें व पैशाचीं पिकें यांच्या उत्पन्नामध्यें जो हल्लीं फरक आहे तो नाहींसा केला पाहिजे.

सरकारनें जर हा उत्पन्नाच्या बाबतींत होणारा तोटा भरून काढण्याकरितां कांहीं सवलती अगर धान्याचे भाव वाढवून दिले अगर पैशाच्या पिकांचे भाव कमी केले तर कोणताहि देशप्रेमी शेतकरी धान्याचेंच पीक घेईल. परंतु जोपर्यंत ह्या उत्पन्नाच्या आकड्यांत फरक आहे तोंपर्यंत नुसत्या शेतकऱ्यास आपण त्याग करा असें कसें सांगूं शकाल ?

सिंदखेडें, प. खानदेश | सु. सु. मावसार

## अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीचे संभाव्य आर्थिक परिणाम

(मा. म. काळे)


अमेरिकेच्या अध्यक्षस्थानीं आयझेन होअर हे निवडून आल्यामुळें गेलीं २० वर्षें चालू असलेलें डेमोक्रॅटिक पक्षाचें राजकारण हळूहळू संपुष्टांत येऊन रिपब्लिकन मताचा. प्रभाव होणार हें निश्चित आहे. आयझेन होअर यांच्या विजयामुळें जगाच्या राजकारणाला आर्थिक दृष्ट्या निराळें वळण लागण्याचा बराचसा संभव दिसतो. विशेषतः कोरियन प्रकरणाच्या बाबतींत एकदम कणखर धोरण स्वीकारलें जाऊन त्यामुळें कॉम्युनिस्टांच्या संचाराला आळा बसेल हें शक्य आहे. यामुळें जपानचें आर्थिक, औद्योगिक व व्यापारी महत्त्व निश्चित वाढेल. निवडणुकीचा निकाल जाहीर होतांच जपानच्या व्यापारी क्षेत्रांत शेअर्सचे भाव चढले ही गोष्ट सूचक समजली पाहिजे. ब्रिटनच्या दृष्टीनें यां निवडणुकीचा विशेष प्रत्यक्ष फायदा होणार नाहीं, परंतु आर्थिक दृष्ट्या गेल्या तीन–चार वर्षांतील घटनांचा विचार केला असतां असें दिसतें कीं यापुढें ब्रिटनचा जास्त भर कॉमनवेल्थमधील घटक देशांची व्यापारी व आर्थिक फळी जास्त मजबूत करण्याकडे राहील. लंडन येथें लौकरच भरणारी कॉमनवेल्थमधील अर्थमंत्र्यांची परिषद ही या दृष्टीनें महत्त्वाची ठरेल. डॉलरपासून कायमची मुक्तता करून घेण्याचें धोरण या परिषदेमध्यें आंखलें जाण्याचा संभव आतां बराच वाढला आहे. कारण, यापुढें अमेरिकन मदतीवर किंवा अमेरिकेच्या सहानुभूतीच्या धोरणावर ब्रिटन अवलंबून राहणार नाहीं. ब्रिटन व इतर राष्ट्र-कुटुंबांतील देश यांची डॉलर टंचाईपासून कायमची मुक्तता झाली तर ती गोष्ट कल्याणकारकच ठरणार आहे. या दृष्टीनें हिंदचेंहि धोरण कांहींसें निश्चित होईल व पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाच्या दृष्टीनें व्यावहारिक दृष्ट्या यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले जातील. अमेरिकेच्या मदतीवर आपल्याला पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी मोठ्या प्रमाणांत अवलंबून राहाणें योग्य नव्हे, हें मत हिंदमधील आर्थिक प्रश्नांच्या बाबतींत जबाबदार अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं व्यक्त केलें आहेच.

रिपब्लिकन पक्षाच्या विजयामुळें परदेशांना दिली जाणारी आर्थिक मदत कांहीं प्रमाणांत कमी होईल किंवा निदान मदत देतांना इतर कांहीं बंधनें अमेरिकेकडून लादलीं जाण्याचा संभव आहे. भांडवलशाहीच्या विचारसरणीनें कॉम्युनिस्टांना सची करणें असें रिपब्लिकन पक्षाचें कडक धोरण राहील. लष्करी सत्तेच्या जोरावर हें धोरण तात्पुरतें यशस्वीहि होईल. परंतु याच वेळीं ब्रिटिश कॉमनवेल्थमधील देश, कीं ज्यांचा समाजवादाच्या दृष्टीनें सुधारणा करण्याकडे जास्त कल आहे, हे आर्थिक व व्यापारी दृष्ट्या अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करतील. यामुळें पुढें लौकरच, अमेरिकेनें गेल्या कांहीं वर्षांत आपल्या विशिष्ट धोरणानें निर्माण केलेली इतरांची सहानुभूति कदाचित् ओसरत जाईल व त्यामुळें पुढें आर्थिक दृष्ट्या जागतिक राजकारणांत कॉम्युनिस्ट विरुद्ध समाजवादाकडे झुकणारे देश असे दोन गट निर्माण होऊं शकतील, व यापैकी समाजवादी गट जास्त प्रभावी बनेल.

आयझेन होअरनीं सोन्याचा भाव वाढवावयास संमती दिली तर त्यामुळें अमेरिकेचा तात्पुरता फायदा झाला तरी दीर्घकालीन परिणामांच्या दृष्टीनें अमेरिकेबद्दलची सहानुभूति ओसरत जाईल व अमेरिकेच्या गेले कित्येक वर्षें चालू असलेल्या एकांगी परराष्ट्रीय


SAVE to help yourself and the NATION

WITH THE



HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.
शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंद्रुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चोकशी करावी.
पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्हीं. पांडव, मॅनेजर

व्यापाराला जगांतील देश कटाळून अशा व्यापारी संबंधा-पासून आपली मुक्तता करण्याचा प्रयत्न करतील. अमेरिकेचें एकतर्फी व्यापारा धोरण (वन वे ट्रेड) फार काळपर्यंत यशस्वी होऊं शकणार नाहीं. केवळ भांडवलशाहीच्या विकासाच्या किंवा प्रगतीच्या दृष्टीनें रिपब्लिकन पक्षाचें राजकारण चालल्यास, (व तसेंच तें चालविलें जाईल अशी बरीच शक्यता आहे,) त्यामुळें ब्रिटिश कॉमनवेल्थमधील घटक देश हे स्वतःच्या पायावर उभें राहाण्याचा प्रयत्न करतील. यामुळें पश्चिम युरोपांतील देशहि आपली आर्थिक संघटना जास्त प्रभावी बनवतील. आज अमेरिकेच्या कृपेवर किंवा मदतीवर अवलंबून असणारे देश स्वावलंबी व परस्पराशीं सहकार करण्याचें धोरण जास्त प्रमाणांत स्वीकारण्याचा निश्चित प्रयत्न करतील असें दिसतें.

---

**दि मुरगुड सहकारी बँक लि., मुरगुड**

या बँकेची स्थापना ११-१२-१९४७ इ. रोजीं झाली आहे. कसबा मुरगूड हा गांव निपाणी व फोंडा यांचे मध्य सेंटरवर असून मुरगूड ही या भागांतील व्यापाराची मोठी पेठ आहे. अशा पेठेच्या ठिकाणीं एका सहकारी बँकेची उणीव बरेच दिवस भासत होती, ती ही बँक स्थापन होऊन नाहींशी झाली आहे. या बँकेचे बहुतेक सभासद मुरगूडच्या आसपासचे भागांतील शेतकरी व व्यापारी असून या भागांतील मंडळींनीं ही बँक स्थापन करणेचे बाबतींत बरीच मदत केली आहे.

त्याचप्रमाणें, संस्था स्थापन झालेपासून राजा ऑफ कागल सि. यांनीं या संस्थेस हरएक तऱ्हेनें मदत करून संस्था नांवा-रूपाला आणणेचें श्रेय घेतलें आहे. या संस्थेचे उत्पादकांपैकी मे. शिवगोंडा विठोजी पाटील यांनीं आरंभापासून प्रेसिडेंटशिप स्वीकारून व मे. शंकरराव सखाराम पाटील यांनीं मॅनेजिंग डायरेक्टरचें काम चांगल्या तऱ्हेनें करून संस्था प्रगतिपथाच्या मार्गावर नेलेली आहे. या संस्थेचें वसूल शेअर भांडवल रु. १,००,००० झालें असून सभासद संख्या २,१५७ आहे. या बँकेमार्फत शेती व व्यापाराकरितां कर्जें दिलीं जात असून सोनें व माल तारणा-वरहि कर्जें दिलीं जातात. या बँकेची शाखा राधानगरी येथें आहे. बँकेनें तीन धान्य दुकानें, एक कापड दुकान, पेंड, सल्फेट, रॉकेल व क्रुडाईल इत्यादि मालांचे डेपो चालविले आहेत. ही बँक स्थापन झालेपासून सभासदांचा व शेतकरी बांधवांचा बराचसा फायदा झालेला आहे. बँकेनें गेल्या वर्षीं ७३,००,००० रु. चा व्यवहार केला व १८,१५१ रु. नफा मिळविला. ६¼% डिव्हिडंड वांटण्यांत आलें.

---

**नायगाराखालून बोगदा**—नायगाराच्या धबधब्याखालून एक बोगदा खणण्याचें काम चालू आहे. हा बोगदा पाण्यासाठी खणण्यांत येत असून तो २,००० फूट खोलीवर आहे. सर्व बोगदा पुरा झाला म्हणजे २,००० टन सडक व माती खोदली जाईल. नायगारा हें ठिकाण नवविवाहितांच्या सहलस्थानापैकी आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—म्हैसूर सरकारनें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्या-साठी २५ लाख रुपयांचें भांडवल लागणार असून तें खाजगी भांडवलदारांकडून व सरकारकडून उभारण्यांत येणार आहे, असें समजतें.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.

# बँक ऑफ पूना लि.

(शेडयूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काशीराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षें ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २. | गो. गं. साठे, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.